।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)


जा.क्र.कबचौउमवि/२/२८०/२०२१ दि.१६/१०/२०२१

**प्रति,**

१) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांचे मा. प्राचार्य / संचालक,

२) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळा /परिसंस्था/विभाग यांचे मा.संचालक / विभागप्रमुख,

**विषय**:- विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ प्रशाळा सुरू करणेबाबत. .

**संदर्भ**:- (१) महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण/२०२१/ प्र.क्र.६/विशि-३,दि.१३ ऑक्टोबर, २०२१

(२) मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांच्या कडील पत्र जा.क्र.युएनआय(८२/२१)/विशि-१/११०८८ दि.१४ ऑक्टोबर,२०२१

(३) मा. सहसंचालक (उच्च शिक्षण) जळगाव विभाग जळगाव यांच्या कडील पत्र जा.क्र. ससं./उशि/वर्ग सुरू करण्यातबाबत/२०२१/४६८७ दि.१४ ऑक्टोबर,२०२१

(४) मा.जिल्हाधिकारी, जळगाव, धुळे व नंदूरबार यांना अग्रेषित पत्र जा.क्र. कबचौउमवि/ २/२७९/२०२१/ दि. १४ ऑक्टोबर,२०२१

**महोदय/ महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भांकित शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग **दि.२० ऑक्टोबर, २०२१** पासून सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, विद्यापीठ / महाविद्यालयाचे वर्ग ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेने सुरू करण्याबाबत स्थानिक प्राधिकरणांशी विचारविनिमय करून निर्णय घेण्याबाबत कळविण्यात आले आहे.

या संदर्भात आपले महाविद्यालय/ परिसंस्था ज्या आयुक्त, महानगरपालिका/ नगरपालिका किंवा जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचे अंतर्गत येतात, त्यांच्याशी कोव्हिड-१९ या आजाराचा स्थानिक पातळीवरील प्रादुर्भाव व स्थानिक परिस्थिती, प्रतिबंधित प्रक्षेत्रांचे नियोजन व आरोग्यविषयक पायाभूत सुविधांची उपलब्धता इ. बाबी विचारात घेऊन कोव्हिड-१९ संदर्भात विद्यापीठाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या कोव्हिड-१९ नियमावली पुस्तीका, मार्गदर्शक सूचना / परिपत्रके तसेच शासनाचे मानक कार्य प्रणाली (एसओपी) इ. सर्व नियमांचे तंतोतंत पालन करून माहविद्यालये/परिसंस्था वरील प्रमाणे नमूद केलेल्या स्थानिक प्राधिकरणाची परवानगी घेवून १८ वर्षावरील विद्यार्थी/विद्यार्थीनी ज्यांनी कोव्हिड-१९ च्या लसीचे दोन्ही डोस घेतलले आहेत अश्याच विद्यार्थी/विद्यार्थीनींना महाविद्यालयात प्रत्यक्ष उपस्थितीत राहून वर्ग सुरू करण्याबाबत निर्णय घेण्यात यावा.

**पुढे.२.वर**


उमविनगर, जळगाव – ४२५००१ (महाराष्ट्र) भारत , दुरध्वनी क्र.: ०२५७–२२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७–२२५८४०३,४०६
Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257- 2258428, 2258429
Fax No. 0257-2258403, 406. E-mail : registrar@nmu.ac.in Web: www.nmu.ac.in

याबाबत संदर्भ क्र.०४(चार) अनुसार विद्यापीठ परिक्षेत्रातील जळगाव, धुळे व नंदूरबार जिल्हयांचे मा. जिल्हाधिकारी यांना उपरोक्त बाबतीत योग्य ते मार्गदर्शनास्तव कळविण्यात आलेले आहे.

उपरोक्त शासन परिपत्रकाप्रमाणे ज्या विद्यार्थी /विद्यार्थीनींना प्रत्यक्ष महाविद्यालयात उपस्थित राहता येणार नाही, त्यांना ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच वसतिगृहे टप्प्या-टप्प्याने सुरू करणेबाबत मा. संचालक (उच्च शिक्षण) व संचालक (तंत्र शिक्षण) यांच्या आढाव्यानंतर प्राप्त निर्देशानुसार योग्य कार्यवाही करण्यात यावी. त्याचप्रमाणे ज्या विद्यार्थी /विद्यार्थीनीं, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कोव्हिड-१९ ची लस घेतली नसेल त्यांनी महाविद्यालय,परिसंस्था व विद्यापीठ प्रशाळा यांचे मा. प्राचार्य / संचालक यांच्या मदतीने स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधून लसीकरण प्राध्यान्याने पूर्ण करून घ्यावे, या बाबतीत कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास त्वरीत सादर करावा.

यासंदर्भात शासनाचे अथवा सक्षम प्राधिकरणाचे काही वेगळे आदेश प्राप्त झाल्यास त्या संदर्भात स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. त्याच प्रमाणे वरील सूचनांच्या अनुषंगाने विद्यापीठ प्रशाळा व विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलग्नित सर्व महाविद्यालये/परिसंस्था यांनी त्यांच्या महाविद्यालय/परिसंस्थेकरीता योग्य निर्देश त्यांच्या स्तरावर निर्गमित करावेत,ही विनंती.

आपला विश्वासू
16/10/2021.
(प्रा. रा. ल. शिंदे)
प्र.कुलसचिव

**प्रती,**

१. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.
२. विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक/विभागांचे प्रमुख,कबचौउमवि., जळगाव.
३. सर्व प्रशासकीय विभागांचे विभाग प्रमुख/नियंत्रक अधिकारी, कबचौउमवि., जळगाव.
४. मानद संचालक, विद्यापीठाचे प्रताप तत्वज्ञान केंद्र, अमळनेर.
५. कार्यकारी संचालक, विद्यापीठाचे महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे.
६. नियंत्रक अधिकारी, विद्यापीठाचे एकलव्य प्रशिक्षण केंद्र, नंदुरबार.

**प्रत माहितीसाठी :**

१. सन्माननीय सर्व व्यवस्थापन परिषद सदस्य, कबचौउमवि., जळगाव.
२. विविध विद्याशाखांचे मा. अधिष्ठाता, कबचौउमवि., जळगाव.
३. मा. कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि., जळगाव.
४. मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि., जळगाव.
५. मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत, पुणे
६.मा. शिक्षण संचालक, (तंत्र शिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव. ७ .मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि, जळगाव.
८. मा.प्र.वित व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव. ९.जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव.

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण २०२१/प्र.क्र.६/विशि-३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १३ ऑक्टोबर, २०२१

प्रस्तावनाः-

राज्यातील ग्रामीण भागातील इयत्ता ५ वी ते १२ वी व शहरी भागात इयत्ता ८ वी ते १२ वी चे वर्ग दि. ०४ ऑक्टोबर, २०२१ पासून सुरु करण्यात आले आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थी हे १८ वर्षांवरील असून बहुतेक विद्यार्थ्यांचे लसीकरण झाले असण्याची शक्यता आहे. तसेच, राज्यातील कोव्हिड-१९ बाधित रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झालेली असून सद्यस्थितीत ही साथ नियंत्रणाखाली आल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमध्ये कोव्हिड प्रतिबंधात्मक सर्वसाधारण उपाययोजना करुन विद्यार्थ्यांकरिता ऑफलाईन पध्दतीने नियमित वर्ग सुरु करणे विद्यार्थ्यांच्या हिताचे राहील. सबब, राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रकः-

१. राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग दिनांक २० ऑक्टोबर, २०२१ पासून सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि, विद्यापीठ/महाविद्यालयांचे वर्ग ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेने सुरु करण्याबाबत स्थानिक प्राधिकरणांशी विचारविनिमय करुन विद्यापीठांनी त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा.

२. १८ वर्षावरील विद्यार्थी ज्यांनी कोव्हिड-१९ च्या लसीचे दोन्ही डोस घेतलेले आहेत, तेच विद्यार्थी/विद्यार्थीनी विद्यापीठ व महाविद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहू शकतील.

३. प्रतिबंधित प्रक्षेत्रात येणारी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये ही ज्या आयुक्त, महानगरपालिका/ नगरपालिका किंवा जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचे अंतर्गत येतात, त्यांच्याशी कोव्हिड-१९ च्या आजाराचा स्थानिक पातळीवरील प्रादुर्भाव व स्थानिक परिस्थिती, प्रतिबंधित प्रक्षेत्रांचे नियोजन व आरोग्यविषयक पायाभूत सुविधांची उपलब्धता या बाबी विचारात घेऊन, विद्यापीठे व महाविद्यालये सुरु करण्याबाबत विचारविनिमय करुन योग्य तो निर्णय संबंधित

विद्यापीठाने त्यांच्या स्तरावर घ्यावा व त्यानुसार महाविद्यालयांना सविस्तर मार्गदर्शक सूचना/ मानक कार्य प्रणाली (एसओपी) देण्यात यावी.

४. राज्यातील सुरु होणाऱ्या सर्व विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांनी कोव्हिड-१९ च्या व्यवस्थापनाबाबतचे राष्ट्रीय निदेश, कामांच्या ठिकाणांबाबतचे अतिरिक्त निदेश, राज्य शासनाने वेळोवेळी काढलेली मार्गदर्शक तत्त्वे किंवा मानक कार्य प्रणाली (एसओपी) तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

५. ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनींना प्रत्यक्ष महाविद्यालयात उपस्थित राहता येणार नाही, त्यांना ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.

६. वसतीगृहे टप्प्या-टप्प्याने सुरु करण्याबाबत संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आढावा घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी.

७. ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनींनी कोव्हिड-१९ ची लस घेतलेली नाही, त्यांच्याकरिता विद्यापीठाने संबंधित संस्थांचे प्रमुख/ महाविद्यालयांचे प्राचार्य यांचे मदतीने स्थानिक जिल्हा प्रशासनाशी समन्वय साधून लसीकरणासाठी विशेष मोहिम राबवून लसीकरण प्राधान्याने पूर्ण करुन घ्यावे. तसेच विद्यापीठ/महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे देखील लसीकरण प्राधान्याने करुन घ्यावे.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२११०१३१६४६०१५५०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Pravinkumar Gulabrao Pawar

Digitally signed by Pravinkumar Gulabrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8de261729f06eda4a56aba947eceb6140d7406426b2f08c9317bea2458ec1f92, serialNumber=8f18625adb482a7ee2512cea93ce697388c95a99c89e41e85c05a3de8476488f, cn=Pravinkumar Gulabrao Pawar
Date: 2021.10.13 17:03:52 +05'30'

( प्रविणकुमार पवार )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

४. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

५. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

७. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

८. प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

९. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

१०. कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे

११. कुलगुरु, सर्व अभिमत विद्यापीठे

१२. कुलगुरु, सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे

१३. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड

१४. कुलगुरु, कवि कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर

१५. कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

१६. सर्व महानगरपालिका आयुक्त

१७. सर्व जिल्हाधिकारी

१८. प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१९. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, पुणे

२०. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई

२१. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई

२२. निवडनस्ती (विशि-३).

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.

www.dhepune.gov.in E-mail- vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६१२४६३९,२६०५१५१२

क्रमांक- युएनआय/(८२/२१)/विशि-१ / 990.CC दिनांक- 14 OCT 2021

प्रति,

कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे,
कुलगुरु, सर्व अभिमत विद्यापीठे.
कुलगुरु, सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे.

विषय राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करणेबाबत

संदर्भ शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण२०२१/प्र.क्र.६/विशि-३ दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भिय शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे, कृपया अवलोकनी घ्यावी.

वरील संदर्भिय शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत- माहितीस्तव सादर
१.स्वीय सहाय्यक, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२.स्वीय सहाय्यक, मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३.मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
प्रत- माहिती व कार्यवाहीसाठी.
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२/- त्यांना कळविण्यात येते की, सदरचा शासन निर्णय आपल्या विभागातील सर्व विद्यापीठांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावा.

**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक,उच्च शिक्षण,जळगांव विभाग,जळगांव**
जीवन प्राधिकरण कार्यालय, ग्राहक न्यायालयाच्या मागे, आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव
दूरध्वनी/फॅक्सक्र.०२५७/२२३८५१०  Emall:jdhe_jal@yahoomail.co.in

जा.क्र.ससं/उशि/वर्ग सुरू करण्याबाबत/2021/४६८८  दिनांक -२८.१०.२०२१

**अत्यंत महत्त्वाचे -**

1.कुलसचिव,
कवयत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगांव.

2.प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित,विनाअनुदानित,कायम विनाअनुदानित कला,
वाणिज्य विज्ञान,विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालय जळगांव,धुळे व नंदुरबार.

विषय:-राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे,अभिमत विद्यापीठे स्वयंअर्थसहाय्यित विद्यापिठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरू करणेबाबत.

संदर्भ:-मा.संचालनालयाचे पत्र क्रं.युएनआय/(82/21)विशि-1/11088,दि.14.10.2021.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की,संदर्भिय शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे कृपया अवलोकनी घ्यावी सोबत जोडलेल्या शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही आपल्या स्तरावरून करण्यात यावी.

(डॉ.संतोष चव्हाण )
सहसंचालक,
उच्च शिक्षण,जळगांव विभाग,
जळगांव.

प्रति-मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य,पुणे-1 यांना प्रत माहितीस्तव तथा सविनय सादर